नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २२/०८/२०२६ (शनिवार )

.....................................................................................

## नियोजन भवन येथे पालकमंत्री यांचा नागपुर ग्रामीण जिल्हयातील पोलीस पाटलांशी संवाद;

## पोलीस पाटलांकडून AI टूल्सच्या प्रत्यक्ष वापराचे सादरीकरण

आज दिनांक २२/०८/२०२६ रोजी नियोजन भवन, नागपूर येथे नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील **AI** टूल्सचे प्रशिक्षण घेतलेल्या पोलीस पाटलांशी मा. ना. श्री. चंद्रशेखर बावनकुळे, महसुल मंत्री तथा पालकमंत्री नागपूर जिल्हा यांनी संवाद साधला. यावेळी पोलीस पाटलांनी प्रशिक्षणादरम्यान आत्मसात केलेल्या विविध कृत्रिम बुद्धिमत्ता (**Artificial Intelligence – AI**) टूल्सचा प्रत्यक्ष वापर करून प्रात्यक्षिक सादर केले. यावेळी मा.डॉ राजीव पोतदार, विधान परिषद सदस्य, मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा तसेच श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा हे उपस्थित होते.

पोलीस पाटलांनी **AI** तंत्रज्ञानाच्या माध्यमातून दैनंदिन कामकाज अधिक सुलभ, जलद, अचूक व कार्यक्षम कसे करता येते, याचे प्रत्यक्ष उदाहरणांसह सादरीकरण केले. विशेषत: गावपातळीवरील कायदा व सुव्यवस्था, गुन्हे प्रतिबंध, सायबर गुन्ह्यांबाबत जनजागृती, माहितीचे संकलन तसेच पोलीस यंत्रणेसोबतचा समन्वय अधिक प्रभावी करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर कसा करता येईल, याबाबतही पोलीस पाटलांनी आपले अनुभव व प्रात्यक्षिके सादर केली. मा. ना. श्री. चंद्रशेखर बावनकुळे, महसुल मंत्री तथा पालकमंत्री नागपूर जिल्हा यांनी पोलीस पाटलांशी संवाद साधून **AI** तंत्रज्ञानाच्या वापराबाबत त्यांचे अनुभव जाणून घेतले. यावेळी पोलीस पाटलांनी **ChatGPT, Gemini, Grok, Meta AI, Claude** यांसारख्या विविध आधुनिक **AI** टूल्सचा दैनंदिन कामकाजात प्रभावीपणे कसा वापर करता येतो, याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर केले.यामध्ये सायबर गुन्ह्यांबाबत जनजागृती पोस्टर तयार करणे, महिला सुरक्षा व जनजागृतीसाठी माहितीपूर्ण साहित्य तयार करणे, तसेच महसूल विभागाशी संबंधित पीक पाहणी पंचनामे तयार करण्यासाठी **AI** टूल्सचा प्रभावी वापर कशा पद्धतीने केला जात आहे, हे पोलीस पाटलांनी प्रत्यक्ष उदाहरणांसह दाखविले.

नागपूर ग्रामीण पोलीस दलाच्या पुढाकाराने पोलीस पाटलांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती व त्याचा योग्य वापर करता यावा, यासाठी **IIT** तसेच **IIM** मधील तज्ज्ञ आणि संबंधित उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनातून **AI** टूल्सचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. गावपातळीवर कार्यरत असलेल्या पोलीस पाटलांना आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देऊन त्यांची कार्यक्षमता वाढविण्याच्या नागपुर ग्रामीण जिल्हयाच्या या उपक्रमाचे मा. ना. श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी कौतुक केले. नागपूर ग्रामीण पोलीसांच्या पुढाकाराने पोलीस पाटलांसाठी आयोजित करण्यात आलेल्या **AI** टूल्स कार्यशाळेच्या माध्यमातून आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य, सुरक्षित व जबाबदारीने वापर करून पोलीसिंग अधिक स्मार्ट, गतिमान आणि परिणामकारक करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.






Nagpur Smart Surveillance & ITMS - Five Work Areas

# नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीसांकडून पोलीस पाटलांसाठी AI टूल्स कार्यशाळेचे आयोजन
# आधुनिक कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाच्या वापरातून पोलीस पाटलांची कार्यक्षमता वाढविण्यावर भर

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील पोलीस पाटील यांना आधुनिक कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence – AI) तंत्रज्ञानाची माहिती मिळावी तसेच त्याचा दैनंदिन कामकाजात प्रभावी, सुरक्षित व जबाबदारीने वापर करता यावा, या उद्देशाने AI टूल्स कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले.या कार्यशाळांमध्ये नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील पोलीस पाटील यांना विविध AI टूल्सचे प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण देण्यात आले.

**सावनेर उपविभाग** :—श्री. सागर खडे, सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, सावनेर विभाग यांच्या नेतृत्वात दिनांक १४/०८/२०२६ रोजी पोलीस स्टेशन सावनेर येथे AI टूल्स कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले.

**उमरेड उपविभाग** :— श्री. मयंक माधव, सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, उमरेड विभाग यांच्या नेतृत्वाखाली दिनांक १४/०८/२०२६ रोजी पोलीस स्टेशन भिवापूर येथे पोलीस पाटलांसाठी AI टूल्स कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

**कन्हान उपविभाग** :— श्री. संतोष गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी, कन्हान विभाग यांच्या नेतृत्वाखाली पोलीस स्टेशन कन्हान येथे दिनांक १४/०८/२०२६ व दिनांक २२/०८/२०२६ रोजी तसेच पोलीस स्टेशन वडोदा येथे दिनांक १४/०८/२०२६ रोजी पोलीस पाटलांसाठी AI टूल्स कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

**काटोल उपविभाग** :—श्री. पराग पोटे, उपविभागीय पोलीस अधिकारी, काटोल विभाग यांच्या नेतृत्वाखाली दिनांक १४/०८/२०२६ रोजी पोलीस स्टेशन नरखेड येथे पोलीस पाटलांसाठी AI टूल्स कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले.

**रामटेक उपविभाग** :— श्री. रमेश बरकते, उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक विभाग यांच्या नेतृत्वाखाली दिनांक १४/०८/२०२६ रोजी पोलीस स्टेशन देवलापार पोलीस स्टेशन रामटेक येथे आणि पोलीस स्टेशन अरोली येथे तसेच दिनांक २०/०८/२०२६ रोजी पोलीस स्टेशन पारशिवणी येथे पोलीस पाटलांसाठी AI टूल्स कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले.

**AI तंत्रज्ञानाचा जबाबदारीने वापर करण्याबाबत मार्गदर्शन**

कार्यशाळेदरम्यान तज्ज्ञ तसेच संबंधित उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांनी विविध आधुनिक AI टूल्सचा प्रभावी, सुरक्षित व जबाबदारीने वापर कसा करावा, याबाबत प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. माहितीचे संकलन व विश्लेषण, दैनंदिन कामकाज सुलभ करणे, आवश्यक माहितीचे आकलन करणे, वेळेची बचत करणे तसेच कामकाज अधिक कार्यक्षम करण्यासाठी AI तंत्रज्ञानाचा संभाव्य वापर याबाबत प्रशिक्षण देण्यात आले.यासोबतच आधुनिक तंत्रज्ञानाचा पोलीस कामकाजात प्रभावी वापर करण्याबरोबरच गावपातळीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे, सायबर गुन्हे, चोरीच्या घटना व इतर गुन्ह्यांना प्रतिबंध करणे यासाठी पोलीस पाटील व पोलीस यंत्रणा यांच्यातील समन्वय अधिक बळकट करण्यावर विशेष भर देण्यात आला.

**सदर कार्यशाळेस नागपुर ग्रामीण जिल्हयातील पोलीस पाटील मोठ्या संख्येने उपस्थित होते. आधुनिक AI तंत्रज्ञानाचा योग्य, सुरक्षित व जबाबदारीने वापर करून पोलीस यंत्रणेच्या कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी नागपूर ग्रामीण पोलीसांकडून आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करताना त्याचा लोकहित, कायदा व सुव्यवस्था आणि गुन्हे प्रतिबंधासाठी जबाबदारीने वापर करण्याच्या दिशेने हा महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आला.**












पोलीस स्टेशन देवलापार
ए आय तंत्रज्ञानावर
कार्यशाळा


पोलीस स्टेशन अरोली
जि. नागपूर (ग्रामीण)
AI टूल
कार्यशाळा

# अंबिका फॉर्म हाऊस येथील द क्विन्स व्हिला येथे सुरू असलेल्या जुगार अड्डयावर कारवाई , एकुण ३२ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, रोख रक्कम व मोबाईल चारचाकी वाहनासह ३० लाख ३८ हजार ८०० रूपयांचा मुद्देमाल जप्त नागपुर ग्रामीण पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन कोंढाळी :— **मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा तसेच श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल उपविभाग प्रभार सावनेर उपविभाग यांच्या मार्गदर्शनाखाली, दिनांक २१/०८/२०२६ रोजी कोंढाळी पोलीस व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलीस स्टेशन कोंढाळी हद्दीतील पांजरा गोविंद शिवारातील अंबिका फॉर्म हाऊस येथील द क्विन्स व्हिला येथे सुरू असलेल्या जुगार अड्ड्यवर धडक कारवाई केली.सदर कारवाईदरम्यान ५२ ताशांच्या पत्त्यांवर जुगार खेळणाऱ्या इसमांसह जुगार अड्ड्यरच्या मालकाविरुद्ध एकूण ३२ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

गोपनिय माहीती मिळताच कोंढाळी पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचुन घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी आरोपी नामे **१) ओमप्रकाश नेतराम ठवळे, वय ४६ वर्षे, रा. वॉर्ड क्र. ३, वर्धमान नगर, बुटीबोरी, ता. जि. नागपूर २) कृष्णा चतुर उईके, वय ५२ वर्षे, रा. बिडीपेठ, गणेश मंदिराजवळ, नागपूर. ३) हितेश धर्मराज भगत, वय ३० वर्षे, रा. चंद्रकिरण नगर, एसबीआय बँकेमागे, हुडकेश्वर, नागपूर ४) सुनिल गोपीचंद बावणे, वय ४८ वर्षे, रा. नवीन सुबेदार लेआउट, गणेश मंदिराजवळ, नागपूर. ५) भुपेश प्रभाकर माने, वय ४२ वर्षे, रा. राधाकृष्ण नगर, राजापेठ पेट्रोलपंपाजवळ, हुडकेश्वर, नागपूर. ६) नेमीचंद प्रेमलाल सूर्यवंशी, वय ५७ वर्षे, रा. परासिया बाजार चौक क्र. २, जि. छिंदवाडा, मध्यप्रदेश. ७) गुरूपाल सुरेश धुंदडाटे, वय ३० वर्षे, रा. गाडगेनगर, रमना मारोती, नागपूर. ८) गणेश अंकुश पेरकुडे, वय २५ वर्षे, रा. बरबडी, ता. समुद्रपूर, जि. वर्धा. ९) रितेश मनोहर गोडबोले, वय ३६ वर्षे, रा. सोमवारी क्वॉर्टर, बुधवार बाजाराजवळ, नागपूर. १०) सौरभ अशोकराव कुरसो, वय २७ वर्षे, रा. रामटेक नगर, हनुमान मंदिराजवळ, वासनिक**

यांचे घरी किरायाने, बेसा, नागपूर. ११) सोनल सुरेश श्रीरामे, वय ३९ वर्षे, रा. महात्मा गांधी नगर, रेणुकामाता मंदिराजवळ, हडकेश्वर रोड, नागपूर १२) रोहित धर्मपाल उंदीरवाडे, वय ३२ वर्षे, रा. न्यू बालाजी नगर, गजानन मंदिराजवळ, नागपूर. १३) प्रफुल अविनाश घोड़े, वय ३० वर्षे, रा. बरबडी, ता. समुद्रपूर, जि. वर्धा. १४) आयुष राजेंद्र टेभुरकर, वय २२ वर्षे, रा. विश्वासनगर, कल्लू किराणा दुकानाजवळ, गिट्टीखदान, नागपूर.१५) ओम नरेश देशमुख, वय २३ वर्षे, रा. जरीपटका, बेझनबाग मैदानामागे, नागपूर. १६) अमन संजय शाहू, वय २९ वर्षे, रा. सक्करदरा, गांधी विद्यामंदिर शाळेजवळ, नागपूर. १७) अफरोज फिरोज खान, वय २२ वर्षे, रा. आझाद नगर, छोटी मशीदजवळ, गिट्टीखदान, नागपूर. १८) अल्केश अशोक राजपुत, वय ३८ वर्षे, रा. आंबेडकर वॉर्ड, मुलताई, जि. बैतूल, मध्यप्रदेश. १९) हरी रामभाऊ हातागडे, वय ४२ वर्षे, रा. महात्मा गांधी नगर, कर गणपती मंदिराजवळ, हुडकेश्वर रोड, नागपूर. २०) सुधाकर फागोजी घोनमोडे, वय ५३ वर्षे, रा. सोमवारी क्वॉर्टर, हनुमान वडाचे झाडाजवळ, नागपूर. २१) गणेश सुरेश लाचेरवार, वय ३० वर्षे, रा. संजय गांधी नगर, पांडुरंग भोजनालयाजवळ, हुडकेश्वर, नागपूर. २२) भावेश दिगांबर ठाकरे, वय २० वर्षे, रा. झरप, ता. कामठी, हल्ली हनुमान मंदिराजवळ, खरबी, नागपूर. २३) आदित्य उर्फ आदी गोविंद सूर्यवंशी, वय ३२ वर्षे, रा. कतारिया, जि. छिंदवाडा, हल्ली पंचशील कॉलनी, छिंदवाडा, मध्यप्रदेश.२४) निलय सुधाकर मेश्राम, वय ३० वर्षे, रा. सोमवारी क्वॉर्टर, बुधवार बाजार, नागपूर. २५) रोहन दशरथ समुद्रे, वय ३० वर्षे, रा. हनुमान मंदिराजवळ, वकीलपेठ, रेशीमबाग, नागपूर २६) विकास राधेश्याम चंदनबटवे, वय ३२ वर्षे, रा. विनोबाभावे चौक, रामटेक, ता. रामटेक, जि. नागपूर. २७) सादिक इरफान शहा, वय ३० वर्षे, रा. गौसिया कॉलनी, बडाताजबाग, दिघोरी पुलियाजवळ, नागपूर. २८) मंगेश सुरेश अलोने, वय ३४ वर्षे, रा. दुर्गामाता नगर, राधाकृष्ण नगर, हुडकेश्वर रोड, नागपूर. २९) लोकेश दिलीप जयस्वाल, वय ४० वर्षे, रा. जुटन वसाहत, परासिया, जि. छिंदवाडा, मध्यप्रदेश. ३०) नरेंद्र रमेश गिरी, वय ४० वर्षे, रा. बैतूल, मध्यप्रदेश. ३१) रोहित सुरेश श्रीरामे, रा. म्हाळगी नगर, नागपूर. ३२) नंदकिशोर गौतम, द क्विन्स व्हिला फॉर्म हाऊसचा व्यवस्थापक हे मिळुन आले.

वरील आरोपी क्र. १ ते ३० हे आरोपी क्र. ३१ रोहित सुरेश श्रीरामे याने भरविलेल्या जुगारामध्ये आरोपी क्र. ३२ नंदकिशोर गौतम याच्या ताब्यातील द क्विन्स व्हिला

फॉर्म हाऊस येथे ताश पत्त्यावर पैशांची बाजी लावून हारजितचा जुगार खेळताना मिळून आले. पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते आणि रोख रक्कम १६,०७,७००/— रूपये, जुगार खेळण्यासाठी वापरलेले एकूण ३४८ क्वॉईन, २ प्लास्टिक तासपत्त्यांचे कॅट, पैसे मोजण्याची मशीन, स्विफ्ट डिझायर क्र. एम एच ४९ ए एस ४३४, तवेरा वाहन क्र. एम एच १३/ए व्ही ८०९० अशी वाहने व आरोपींकडील एकूण ३२ अँड्रॉइड मोबाईल **असा एकूण ३०,३८,८००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

**नमुद आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन कोंढाळी येथे कलम ४, ५ महाराष्ट्र जुगार अधिनियम, सहकलम ४९ भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

.





## काटोल पोलीस स्टेशन हद्दीतील ०४ सराईत गुन्हेगारांना नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार


**पोलीस स्टेशन काटोल हदद्दीतील सराईत आरोपी १) जिचना उर्फ मनोज मदन पवार, वय ४५ वर्ष, रा. डोंगरगाव ता. काटोल २) माणिक सिताराम लांडगे, वय ५१ वर्ष, रा. वंडली (खू) ता. काटोल, जि. नागपूर ३) आकाश दिलीप सयाम, वय २४ वर्षे, मरामाय नगर,काटोल जि. नागपुर ४) निलेश भोजराज सेवतकर वय ३८ वर्षे, रा. झिलपा ता. काटोल, जि. नागपूरयांना महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१)** (अ) (ब) **अन्वये हद्दपार करण्यात आले आहे.**

**वर नमुद सराईत गुन्हेगार क्र १ आणि २ यांचेवर अवैध दारू बाबत अनेक गुन्हे नोंद आहे. गुन्हेगार क्र ३ याचेवर मालमत्तेविरूध्द चोरी घरफोडी चे अनेक गुन्हे नोंद आहे. गुन्हेगार क्र ४ याचे वर अवैध जुगाराचे अनेक गुन्हे नोंद आहे. गुन्हेगार क्र .**

नमुद आरोपींचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्यांचे वर कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी यांनी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपी अशा प्रकारचे गुन्हे करीत असल्याने नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली होती तसेच आरोपींच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे नमुद आरोपींचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव काटोल पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल यांच्या मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, काटोल यांचे कडे पाठविला असता त्यांनी

प्रस्ताव मंजुर करून वर नमुद गुन्हेगार क्र १ याला एक महीन्यासाठी आणि २ ते ४ यांना दोन महिन्याकरीता नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले आहे.

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी हे नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.**



जिचना उर्फ मनोज मदन पवार



माणिक सिताराम लांडगे



आकाश दिलीप सयाम



निलेश भोजराज सेवतकर

# भिवापूर पोलीस स्टेशन हद्दीतील ०२ सराईत गुन्हेगारांना नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

पोलीस स्टेशन भिवापूर हदद्दीतील सराईत आरोपी **१) दिनेश मनोहर सावरबांधे, वय ३२ वर्ष, रा. आसगाव, ता. पवनी जि. भंडारा २) विलास दाजीबा मेश्राम, वय ४८ वर्ष, रा. भगवानपूर ता. भिवापूर, जि. नागपूर** यांना महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये हद्दपार करण्यात आले आहे.

**वर नमुद सराईत गुन्हेगार क्र १) याचेवर रेतीचा गौण खनिज चोरी वाहतूक बाबत अनेक गुन्हे नोंद आहे. तसेच सराईत गुन्हेगार क्र २) याचेवर लोकांना धमकाविणे, शिवीगाळ करणे, मारपीट करून जख्मी करणे यासारखे गुन्हे नोंद आहेत.** नमुद आरोपींचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्यांचे वर कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी यांनी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. तसेच त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे नमुद दोन्ही आरोपींचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव भिवापूर पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड यांच्या मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, उमरेड यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर **नमुद आरोपी क्र. १) यास ५ महीन्यांकरीता व आरोपी क्र. २) यास ४ महीन्यांकरीता नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले आहे.**

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी हे नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.**



**दिनेश मनोहर सावरबांधे**



**विलास दाजीबा मेश्राम**

## नरखेड पोलीस स्टेशन अंतर्गत २ सराईत गुन्हेगारांना नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

पोलीस स्टेशन नरखेड अंतर्गत **मालमत्तेविरूध्द गुन्हयातील** आरोपी **क्रं १) रोहित विक्की खोब्रागडे, वय २३ वर्षे, रा. चेतना बुद्ध विहार जवळ, रामबाग इमामवाडा नागपूर,आणि अवैधदारूच्या गुन्हयातील क्र २) अनिल महादेव गोंडाने वय ४७ वर्ष राहणार सिंधी तालुका नरखेड यांना** महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले आहे.

सराईत गुन्हेगार नामे **मालमत्तेविरूध्द गुन्हयातील** आरोपी **क्रं १) रोहित विक्की खोब्रागडे, वय २३ वर्षे, रा. चेतना बुद्ध विहार जवळ रामबाग इमामवाडा नागपूर याचेवर पोलीस स्टेशन नरखेड हद्दीत चोरी, घरफोडी** या सारखे **अनेक गुन्हे नोंद** आहे. **आणि अवैधदारूच्या गुन्हयातील क्र २) अनिल महादेव गोंडाने, वय ४७ वर्ष राहणार सिंधी तालुका नरखेड यांचेवर अवैध दारू बाबत अनेक गुन्हे नोंद** आहे. नमुद आरोपीचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी प्राप्त तक्रारींवर तात्काळ गुन्हे नोंद केले तसेच

त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपींच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे नमुद आरोपीचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव नरखेड पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल यांच्या मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, काटोल यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर नमुद आरोपी **यांना २ महीन्यांकरीता** नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले आहे.

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.**



**रोहित विक्की खोब्रागडे**



**अनिल महादेव गोंडाने**

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०३ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २१/०८/२०२६ रोजी नागपूर ग्रामीण जिल्हयात विशेष मोहिम राबवुन अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०३ आरोपीतांवर कलम २७ एन. डी. पी. एस कायदयान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन काटोल** अंतर्गत आरोपी १) प्रेम अशोक गाढवे, वय २५ वर्ष, रा. आयुडीपी काटोल २) आदित्य वासुदेव बारई, वय २२ वर्ष, रा. चंडीका मंदीर जवळ काटोल हे अर्जुन नगर रेल्वे पटरीजवळ काटोल येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. तसेच आरोपी निशांत प्रकाश नवघरे, वय २६ वर्ष, रा. पंचवटी काटोल हा मरामाय नगर काटोल येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ११ गुन्हे नोंद

दिनांक २१/०८/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू, देशी दारू असा एकुण १०८२०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ११ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन बोरी** येथे आरोपी ब्रिजेश राधेशाम तिवारी, वय ४६ वर्ष, रा. गाडीखाना न्यु शुक्रवारी महल नागपुर ह. मु. हळदगाव, ता. हिंगणा, जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बेला येथे आरोपी नामे** विदर्भ धर्मराज ढोले, वय ३० वर्षे, रा. बेला वार्ड क्र. ०३, ता. उमरेड, जि. नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे **आरोपी १)** उमेश सुर्यभानजी उईके, वय २४ वर्ष, २) राहुल सुर्यभानजी उईके, वय ३२ वर्ष, दोन्ही रा. येरंडा यांचेवर १ गुन्हा नोंद, आरोपी नामे १) छत्रपती भाउराव म्हरसकोल्हे, वय ५६ वर्ष, २) विकास दर्याजी कुंभरे, वय ३६ वर्ष, दोन्ही रा. येरंडा यांचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा येथे आरोपी** नामे १) चरसिंग तारासिंग भोंड, वय ४५ वर्ष, रा. रामठी सिंख बेडा, ता. नरखेड, जि. नागपूर २) ०२ महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक** आरोपी नामे १) अर्जुन बाबुराव वाढीये, वय ४५ वर्ष, रा. पंचाळा, ता. रामटेक, जि. नागपुर २) दुर्गेश रामभाऊ पंधरे, वय ३२ वर्ष, रा. उमरी, ता. रामटेक यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड** आरोपी यशवंत रमेश नान्हे, वय २९ वर्ष, रा. अभ्यकंर चौक उमरेड याचेवर १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन खापा येथे** आरोपी नामे मोरेश्वर माधवराव भुजाडे, वय ७६ वर्ष, रा. नविन वस्ती खापा याचेवर १ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण २९७० मिली देशी दारू, ९५ लिटर मोहाफुल दारू असा एकुण १०८२०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

# नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७०५ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक २२/०८/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील २४ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. एकुण ७०५ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुटिबोरी येथे २९ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३६ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २४ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २१ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २७ आरोपी, पोलीस स्टेशन पाचगाव १२ आरोपी अशा एकुण १२० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ५८ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे १६ आरोपी पोलीस स्टेशन केळवद येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन मोहपा १५ आरोपी अशा एकुण १५२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २१ आरोपी आणि पोलीस स्टेशन वडोदा येथे १८ आरोपी अशा एकुण ७३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३३ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २४ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २७ आरोपी अशा एकुण ११५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ४५ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ५३ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे २७ आरोपी अशा एकुण १५३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.










मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने